# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.01.2025** **वारेःशनिवार**

---

•१८व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप

•२०४७पर्यंत देशातील प्रत्येक समस्येवर तोडगा काढायला हवा - पंतप्रधानांचा मानस

•केंद्राकडून राज्यांना कर हस्तांतरण, महाराष्ट्राला १० हजार ९३० कोटी रुपयांचा निधी

•महाकुंभमेळ्यानिमित्त आकाशवाणीच्या कुंभवाणी या विशेष वाहिनीचं लोकार्पण

•आणि

•महिला क्रिकेटमध्ये ५० षटकांच्या सामन्यात भारताचा आयर्लंडवर सहा खेळाडू राखून विजय

**<u>राष्ट्रपती</u>**

अनिवासी भारतीय समुदाय जगासमोर भारताचं खरं चित्र मांडत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. ओडिशातील भुवनेश्वर येथे आयोजित 18 व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा समारोप करताना त्या काल बोलत होत्या. परदेशातील भारतीय समुदाय सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आहे, अनिवासी भारतीयांकडे केवळ ज्ञान आणि कौशल्यच नाही तर ते आपल्या मूल्यांचीही जोपासना करत आहेत, असे कौतुकोद्गारही राष्ट्रपती मुर्मू यांनी काढले. विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वानं परदेशात ठसा उमटविणाऱ्या २७ अनिवासी भारतीयांना या समारंभात राष्ट्रपतींच्या हस्ते प्रवासी भारतीय

सन्मान प्रदान करण्यात आले. काही केंद्रीय मंत्र्यांसह ओडिशाचे राज्यपाल आणि  मुख्यमंत्री अनेक मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

**<u>पीएम मुलाखत</u>**

विकसित भारताचं ध्येय साकारण्यासाठी 2047पर्यंत देशातील प्रत्येक समस्येवर उपाय काढला जावा अशी आपली इच्छा आहे, सरकारी योजनांची शंभर टक्के अंमलबजावणी होणं गरजेचं असून ते एका अर्थानं सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षतेचंच एक रूप आहे, असं  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एका मुलाखतीत सांगितलं.

आघाडीचे उद्योजक निखिल कामत यांच्या पॉडकास्टसाठी पंतप्रधानांनी ही मुलाखत दिली. एक माणूस म्हणून माझ्याकडून चुका होऊ शकतात, पण मी वाईट हेतूने  कधीही चुका करणार नाही, असंही मोदी यांनी या मुलाखतीत नमूद केलं. राजकारणात यशस्वी होण्यासाठी समर्पण, बांधिलकी, संघभावनेनं काम करणं आणि स्वत: लोकांसाठी कायम उपलब्ध असणं हे गुण आवश्यक असल्याचंही पंतप्रधानांनी अधोरेखित केला. चांगल्या लोकांनी कायम राजकारणात येत राहिलं पाहिजे, आणि केवळ महत्त्वाकांक्षा न ठेवता  ते मिशन समजून काम केलं पाहिजे, असं आपलं मत असल्याचंही, मोदींनी सांगितलं. जवळपास दोन तासांच्या मुलाखतीत पंतप्रधानांनी आपला जीवन प्रवास, शिक्षण, राजकीय कारकीर्द, व्यवस्थापन कौशल्य यासह इतर विषयांवर चर्चा केली.

**<u>करहस्तांतरण</u>**

केंद्र सरकारकडून राज्यांना काल डिसेंबर २०२४ साठी एक लाख ७३ हजार ३० कोटी रुपयांच्या करांच्या रकमेचं हस्तांतरण करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्राचा १० हजार

९३० कोटी ३१ लाख रुपयांचा वाटा आहे. राज्यांना भांडवली खर्चाला गती देता यावी तसंच विकासकामं आणि कल्याणकारी उपक्रमांना वित्त पुरवठा करणं शक्य व्हावं , यासाठी हा निधी जारी करण्यात आला असल्याचं वित्त मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे याबद्दल आभार मानले आहेत. राज्याच्या विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांना यामुळं पाठबळ मिळणार असल्याचं फडणवीस यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**सीएमकन्नमवार**

पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन राज्याच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वानं दिली असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. राज्याचे माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त चंद्रपूरमधे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विदर्भाच्या विकासाकरता कन्नमवार यांनी केलेल्या कार्याचा गौरव फडणवीस यांनी यावेळी केला.

**कुंभवाणी**

प्रयागराज इथं होणाऱ्या महाकुंभमेळयाच्या अनुषंगानं ‘कुंभवाणी’ या आकाशवाणीच्या विशेष वाहिनीचं लोकार्पण उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल केलं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन दूरस्थ

माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कुंभवाणी या वाहिनीवरून आता २६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचं प्रसारण केलं जाणार आहे. आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ या एफएम वाहिनीवरून, 'न्यूज ऑन ए आय आर' ॲप, तसंच 'वेव्ज' या ओ टी टी मंचावरून कुंभवाणीचं प्रसारण ऐकता येईल.

**<u>राममंदिर</u>**

अयोध्येमध्ये श्रीराम मंदिरात रामलल्ला मूर्तीच्या प्राण-प्रतिष्ठा सोहळ्याला आज तिथीने एक वर्ष पूर्ण होत आहे. त्या निमित्तानं आजपासून तीन दिवस अयोध्येमध्ये विशेष सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार आहे. पुण्यातही भक्तीसुधा फाऊंडेशन आणि समर्थ व्यासपीठ या संस्थांच्या वतीने आज सकाळी 11 ते 12 या वेळेत रामरक्षा घरोघरी हा उपक्रम राबण्यात येणार आहे.

**<u>विश्व मराठी</u>**

मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीनं येत्या ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. त्याची अधिकृत घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली .

केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार या संमेलनाच्या उद्घाटनाला उपस्थित राहणार आहेत, असंही त्यांनी सांगितलं. याबाबत अधिक माहिती देताना सामंत म्हणाले-

**राज्यपाल**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने आगामी काळात कापड उद्योग क्षेत्राला सहाय्यभूत ठरणारे अभ्यासक्रम विकसित करावेत, असं आवाहन राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या 20व्या दीक्षांत समारंभात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. या सोहळ्यात 15 हजाराहून जास्त विद्यार्थ्यांना पदवी, 71 जणांना पीएचडी, तर 57 विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षा निमित्त अहिल्यादेवी यांच्या जीवन चरित्रावरील निवडक चित्रांच्या प्रदर्शनाचं उद्घाटनही राज्यपालांच्या हस्ते झालं.

**मानवाधिकार दखल**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी मानव अधिकार आयोगानं गुन्हा दाखल करून घेतला असून आता आयोगमार्फतही या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्यात येणार आहे, अशी माहिती अशी माहिती खासदार बजरंग सोनवणे यांनी दिली. या प्रकरणाची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी सोनवणे यांनी केली होती.

**भाजपा**

अहिल्यानगर जिल्ह्यात शिर्डी इथं उद्या भारतीय जनता पार्टीचं राज्यस्तरीय अधिवेशन होत आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा या अधिवेशनाला उपस्थित राहणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**१२वीवेळापत्रक**

फेब्रुवारी – मार्चमध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र म्हणजेच इयत्ता १२वीच्या परीक्षांचं प्रवेशपत्र सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना ही प्रवेश पत्रं मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून कालपासून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आल्याचं राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी कळवलं आहे.

**खो-खो**

नवी दिल्लीमध्ये १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातील पाच तर महिला संघात तीन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरुष आणि महिला गटाचं कर्णधारपद पुण्यातील खेळाडूंना मिळालं आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी प्रतीक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्णधार प्रतीक वाईकर या स्पर्धेविषयी आकाशवाणीशी बोलताना म्हणाला-

**क्रिकेट**

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघांदरम्यानच्या ५० षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतील राजकोट इथं झालेल्या पहिल्या सामन्यात काल भारतानं सहा खेळाडू राखून विजय मिळवला. आयर्लंडन नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २३८ धावा केल्या. भारतानं ३५व्या षटकातच ४ खेळाडूंच्या मोबदल्यात २३९ धावांचं लक्ष्य पूर्ण करून विजय मिळवला.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली आहे. येत्या 24 तासात विदर्भात हवामान कोरडं राहील, अन्य भागात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**